अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# सुवर्णपदक देऊ न शकणारे दिवाळखोर विद्यापीठ

विद्या आणि शिक्षण ही समाजातील अमूल्य गोष्ट आहे. म्हणजेच ज्यांचे मूल्यमापन किंवा त्याची पैशामध्ये किंमत मोजता येत नाही. म्हणूनच लोक वाटेल तेवढा पैसा खर्च करून शिक्षण घेत असतात. आज या शिक्षणासाठी प्रचंड चढाओढ आणि स्पर्धा सुरू आहे. प्रत्येक क्षेत्रातील विद्यार्थी आपली गुणवत्ता सिध्द करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. आज अनेक विषयातले पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत. गावागावात आणि खेड्यापाड्यातही महाविद्यालये पहायला मिळतात. पंचवीस वर्षांपूर्वी शिक्षणाच्या जेवढ्या संधी नव्हत्या, तेवढ्या आज उपलब्ध झालेल्या आहेत. आणि या संधीचे सोने करून घेण्यासाठी विद्यार्थी आणि पालक प्रयत्न करीत असतात. परंतु विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या या प्रयत्नाकडे विद्यापीठाचे पाहिजे तेवढे लक्ष दिसत नाही. पूर्वीच्या काळी शिक्षणासाठी हालअपेष्टा सहन कराव्या लागत. कारण आजच्या इतक्या सोयीसुविधा त्यावेळी उपलब्ध नव्हत्या. आज मात्र मिळालेल्या सुविधांचा पुरेपुर वापर करून विद्यार्थी आपली गुणवत्ता दाखवित आहेत. त्याला तितक्याच प्रमाणामध्ये विद्यापीठांनी आणि स्वायत्त शिक्षण संस्थांनी प्रोत्साहन द्यायला हवे. त्यांच्या गुणवत्तेचे कौतुक करायला हवे. दुर्दैवाने याच्या उलट परिस्थिती पहायला मिळते. विद्यार्थ्यांना गरज आहे म्हणून ते शिकतात. अशा प्रकारची उपकाराची भावना विद्यापीठांमध्ये निर्माण झालेली आहे. एकेकाळी ज्या मुंबई विद्यापीठाचा अशाच गुणवंत विद्यार्थ्यांबाबत तसाच नावलौकिक होता ती परंपरा आजही टिकविण्याचा प्रयत्न विद्यार्थी करीत आहेत. पण विद्यापीठ मात्र आपल्या दरिद्रीपणाचे प्रदर्शन करीत आहे. यापूर्वी कधीही न घडलेला हा दरिद्रीपणा यंदा विद्यापीठाने दाखविला आहे. साधारणपणे विद्यापीठात वेगवेगळया विषयांमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक दिले जाते. विद्यापीठाकडून मिळणारे हे सुवर्णपदक विद्यार्थ्यांसाठी जीवनामधली फार मोठी ठेव असते. त्यांच्या गुणवत्तेच्या गौरवाबरोबर शिक्षण हे किती अमूल्य आहे, हेदेखील या निमित्ताने सिध्द होते. यंदा मात्र विद्यापीठाला दरिद्रीपणाचे डोहाळे लागलेले दिसतात. कारण सोन्याचे भाव प्रचंड प्रमाणात वाढले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना सोन्याने मढवलेले पदक देता येणार नाही. त्याऐवजी चांदीच्या पदकाला सोन्याच्या पाण्याचा मुलामा केलेले पदक दिले जाईल, अशा प्रकारचे पत्र विद्यापीठाने या गुणवंत विद्यार्थ्यांना पाठविले आहे. अशा प्रकारचा दरिद्रीपणा दाखवून विद्यापीठाने आपल्या लौकिकाला कसा गंज चढलेला आहे हेच दाखवून दिले. तसे तर कागद आणि स्टेशनरीच्याही किंमती वाढत आहेत. म्हणून काही विद्यापीठाने परीक्षा घेणे बंद केलेले नाही किंवा त्यात काटकसरही केलेली नाही. तोच दृष्टिकोन या सुवर्णपदकांबाबत ठेवला पाहिजे. गमतीचा भाग म्हणजे सोन्याच्या भावाबरोबर कारागिरांचीही मजुरी वाढल्यामुळे संपूर्ण सोन्याच्या धातूतील पदक देता येत नाही. अशीही आपली दिवाळखोरी विद्यापीठाने दाखवून दिली आहे. खरे तर ही विद्यार्थ्यांची सरळसरळ फसवणूक ठरते.

## विद्यापीठाला भिकेचे डोहाळे

प्रत्येक विषयानुरुप गुणवत्ता सिध्द करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करणे विद्यापीठाचे कर्तव्य ठरते. यंदा विद्यापीठाच्या कालिना इथल्या शिष्यवृत्ती विभागाने अशा यशस्वी विद्यार्थ्यांना आपण कसे सुवर्णपदक देण्यात असमर्थ आहोत हे पत्राद्वारे कळविले आहे. हा खुलासा करून आपण प्रामाणिकपणा दाखवला असे विद्यापीठाला वाटत असावे. परंतु त्यात त्यांनी आपली पतच घालवलेली आहे. सोन्याचा वाढता भाव असे अतिशय हास्यास्पद कारण देऊन विद्यापीठाने आपल्याला भिकेचे डोहाळे लागल्याचे दाखवून दिले. मुळात जी काही सुवर्णपदके दिली जातात ती समाजातल्या नामवंत व्यक्तींच्या नावाने पुरस्कृत केलेली असतात. त्यासाठी विद्यापीठाकडे संबंधित नामवंतांच्या स्मृत्यर्थ मोठा निधीही ठेव म्हणून जमा केलेला असतो. त्यात विद्यापीठ स्वत:च्या रकमेची भर घालून ही सुवर्णपदके सन्मानपूर्वक देत असते. गुणवत्तेचे मूल्यमापन होऊ शकत नाही. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या या लखलखीत यशाचे कौतुक करण्यासाठी खास सुवर्णधातूची निवड केली गेली. सोन्याचे भाव आतपर्यंत कधीही कमी झालेले नाहीत. दरवर्षी त्यात वाढ होत आलेली आहे. यामुळे पदकाचा खर्च निश्चितच वाढतो यात काही शंका नाही. परंतु, त्या खर्चापेक्षा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची आणि विद्यापीठाच्या लौकिकतेची जास्त किंमत आहे. विद्यापीठाने खर्चाचा विचार करण्यापेक्षा गुणवत्तेचा आणि नावलौकिकाच्या मिळकतीचा जास्त अभिमान बाळगायला हवा. अनेक प्रकारच्या खर्चाची उधळपट्टी होत असताना विद्यार्थ्यांच्या सुवर्णपदावरच संक्रांत आणण्याचे काहीच कारण नाही. उलट या ना त्या मार्गाने किंवा वेळ पडली तर सरकारकडून निधी मागून या सुवर्णपदकांचा सन्मान विद्यापीठाने ठेवायला हवा. भिकेचे प्रदर्शन न करता विद्या, शिक्षण, ज्ञान यासाठी अधिक उदात्त भूमिका विद्यापीठाने घ्यायला हवी. 'सुवर्णपदक' ही गोष्ट विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गुणवत्तेची तितकीच मोलाची मोहर असते. अत्यंत जिद्दीने, कष्टाने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना भविष्याच्या जीवनासाठी फार मोठी शिदोरी प्राप्त होते. मुंबईसारख्या महानगरात आणि तितक्याच उच्च दर्जाच्या विद्यापीठात सुवर्णपदके देताना अशा प्रकारचा दळभद्रीपणा दाखविला जावा ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट ठरते. विद्यापीठाने आव्हान केले तर मुंबईतले पाच-पन्नास दानशूर नक्कीच पुढे येतील आणि विद्यापीठाला आर्थिक मदतही करू शकतील.

## शिक्षणमंत्र्यांनी लक्ष घालावे

गेल्या काही वर्षात एकूणच मुंबई विद्यापीठाने आपला दर्जा वाढविण्यापेक्षा कमी करण्याचाच हव्यास धरलेला दिसतो. मग परीक्षांमधील पेपरफुटीपासून ते परीक्षांच्या वेळापत्रकातील सावळया गोंधळापर्यंत किंवा गुणपत्रिकेतल्या उलटसुलट प्रकारापर्यंत विद्यापीठ बदनाम होत आलेले आहे. असाच गोंधळाचा नमुना दाखविणारा कार्यक्रम गेल्याच महिन्यात १८ ऑक्टोबर रोजी विद्यापीठात झाला. आपापल्या विषयामध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा गौरव करण्याकरिता फोर्टमधल्या पदवीदान सभागृहात बोलवले गेले. प्रत्येक विद्यार्थी मोठ्या अपेक्षेने आणि आनंदाने आपल्या पालकासह उपस्थित होता. परंतु तिथे केवळ लॅमिनेशन केलेले एक प्रमाणपत्र प्रत्येकाच्या हातात ठेवले गेले. या कार्यक्रमाला कुलगुरू उपस्थित राहतील असे सांगितले गेले होते. अर्धा कार्यक्रम झाल्यावर कुलगुरू तिकडे आले आणि प्रकुलगुरूंच्या हस्ते ही प्रमाणपत्रे दिली गेली. तिथे आलेल्या विद्यार्थ्यांना आणि पालकांना पुरेसा चहा पाजण्याचे साधे सौजन्यही विद्यापीठाने दाखविले नाही. एवढ्या मोठ्या दिमाखदार पदवीदान सभागृहात पुरेशा पंख्यांचीदेखील सोय नव्हती. बसायचीदेखील पुरेशी व्यवस्था विद्यापीठाला करता आली नाही. अशा गैरव्यवस्थेने ग्रासलेल्या विद्यापीठाला आता दारिद्र्याचे ग्रहण लागलेले दिसते. शिक्षणमंत्र्यांनी या बेजबाबदारपणाची दखल घ्यायला हवी. गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना सुवर्णपदकच कसे मिळेल, असे विद्यापीठाला आदेश दिले पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विद्यापीठाने आपल्या गरिबीचा नांगर फिरवू नये.